आगच्छत् शिक्षार्थम्। निर्गच्छत् सेवार्थम्।

# महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा) औरंगाबाद

## School Leadership Academy, Maharashtra

## मोड्यूल क्र.२६

# बालगृहातील बालकांचे शिक्षण व शालेय नेतृत्वाची भूमिका

# The Roll of School Leadership and Children Education in BALGRUHA

**प्रस्तावना -**

जन्माला आलेल्या प्रत्येक बालकाला शिक्षणाचा अधिकार आहे. शिक्षण हक्क कायदा 2009 नुसार 6 ते 14 वयोगटातील बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाची तरतूद करण्यात आली आहे. शिक्षण हा वैयक्तिक, सामाजिक, आर्थिक विकासाचा एक मार्ग असल्यामुळे प्राथमिक शिक्षणाला अनन्य साधारण महत्व आहे. परंतु काही बालकांना शिक्षणाच्या प्रवाहात येण्यासाठी आणि शिक्षण प्रवाहात टिकून रहाण्यासाठी शासनाबरोबरच समाज, सेवाभावी संस्था, इ. ची मदत लागते. बालकांच्या घरची आर्थिक परिस्थिती, कौटूंबिक समस्या, पालकांमधील वाद, घटस्फोट, एकल पालकत्व, (विधवा, विधूर, घटस्फोटित), कामानिमित्त स्थलांतर, पालकांचे अज्ञान अशा अनेक कारणांमुळे मुलांच्या शिक्षणात अडथळे निर्माण होतात. अशा स्थितीत मुलांना संगोपन आणि शिक्षण सुरक्षित वातावरणात मिळण्याची नितांत आवश्यकता असते. म्हणून पालकांच्या माध्यमातून किंवा ज्यांना मुलांच्या शिक्षणाची तळमळ आहे अशा समाजातील सुजाण, सुशिक्षित, सजग व जबाबदार घटकांकडून ही मुले बालगृहात आणली जातात. वय वर्ष 0 ते 18 वर्षापर्यंतच्या ज्या मुलांना संगोपन आणि संरक्षणाची आवश्यकता असते त्या मुलांना बालगृहात प्रवेश दिला जातो. प्रवेश दिल्यानंतर निवास, शिक्षण, भोजन, वस्त्र तसेच प्रशिक्षण अशा सुविधा दिल्या जातात आणि तिथून पुढे या मुलांच्या आयुष्याचा एक नवा अध्याय सुरू होतो.

मुलांचे शिक्षण थांबू नये म्हणून अशा मुलांना महिला व बालविकास विभागांतर्गत नोंदणीकृत अनिवासी संस्थेत प्रवेश दिला जातो. यात बालगृह, शिशुगृह, खुले निवारागृह, निरीक्षण गृह/विशेषगृह यांचा समावेश होतो. कोविड -19 मुळे गेली काही वर्षे शाळा बंद असल्यामुळे बालगृहातील बालकांना शिक्षण घेत असताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. या मुलांकडे वैयक्तिक लक्ष देणे देखील शक्य झाले नाही. परंतु या बालकांच्या शैक्षणिक गुणवत्तेत सुधारणा होणे, शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न करणे फार गरजेचे आहे. यासाठी मार्च 2021 मध्ये राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे यांच्या समता विभागाने परिपत्रक प्रसिदध केले आहे, कारण बालगृहातील मुलांच्या शिक्षणात खंड पडू नये, मुले शिक्षणाच्या प्रवाहात रहावीत तसेच मुलांना विषयनिहाय मार्गदर्शन मिळावे यासाठी साधनव्यक्ती, विशेष शिक्षक, विषय सहाय्यक व बालरक्षक यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे. यानुसार बालकांची शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठी नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. याचाच एक भाग म्हणून बालगृहातील बालकांच्या शिक्षणाकडे लक्ष वेधले आहे. या मुलांची कोणत्याही प्रकारे कुचंबणा होऊ नये, शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी बालगृहातील बालकांचे शिक्षण हा विषय शालेय नेतृत्वाच्या दृष्टीकोनातून महत्वाचा आहे.

**मोडयुल अध्ययनाची उदिदष्टे -**

1) शालेय नेतृत्वात बालगृह ही संकल्पना समजून घेणे.

2) बालगृहातील बालकांना येणा-या अडचणींचा शोध घेणे.

3) बालगृहातील बालकांच्या शिक्षणात शालेय नेतृत्वाची भूमिका समजून घेणे.

4) बालगृहातील बालकांच्या शिक्षणात यशस्वी नेतृत्वाचा अभ्यास करणे.

5) बालगृहातील बालकांच्या शिक्षणात यशस्वीरित्या काम करण्यासाठी शालेय नेतृत्वाचा योग्य दृष्टीकोन विकसीत करण्यास मदत करणे.

**बालगृह संकल्पना -**

समाजातील काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांना आधार देण्यासाठी बालगृहांची कल्पना पुढे आली. महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासन हे बालक जीवन, सुरक्षा, विकास सक्षमीकरण आणि सहभाग समग्रपणे व्हावा यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. बालकांचा सर्वांगिण विकास व्हावा आणि ते समाजाच्या मुख्य प्रवाहात सहज सामील व्हावेत यासाठी देखील प्रयत्न केले जातात. बालगृहात वंचित, निराधार, अनाथ दुर्लक्षित आणि अपराधी बालकांची काळजी घेतली जाते. या मुलांसाठी शिक्षण, व्यावसायिक प्रशिक्षणाची सोय केली जाते. बालगृहातील बालकांना बालकल्याण समिती या न्यायालयीन खंडपीठाकडून दाखल केले जाते. बालगृहामध्ये दाखल असणारी बालके ही गुन्हेगार नाहीत तसेच ती बिघडलेली नाहीत केवळ परिस्थीतीमुळे या बालकांना काळजी, संरक्षण गरजेचे असल्याने संस्थेत दाखल केले जाते आणि त्यांचे पालकत्व शासन स्वीकारते.

समाजातील प्रत्येक बालक हे कुटुंबात राहिले पाहिजे तो त्याचा अधिकार आहे शिवाय बालकांची काळजी संरक्षण आणि त्यांचे संगोपन याची प्राथमिक जबाबदारी ही पालकांची आहे. मात्र बालकांना सांभाळण्यासाठी त्यांचे पालक,नातेवाईक नाहीत.अशा बालकांसाठी बालगृह या निवासी संस्था निर्माण करण्यात आल्या आहेत.बालकांना बालकल्याण समितीकडून वर्षातील 12 महिने 24 तासांत कोणत्याही वेळी दाखल करून घेतले जाऊ शकते.

कोल्हापूर जिल्हयात सध्या महिला व बालविकास विभागाच्या 11 नोंदणीकृत संस्था कार्यरत आहेत. यात बालगृह,शिशुगृह, खुले निवारागृह व विधी संघर्षग्रस्त बालकांसाठी निरीक्षण/विशेषगृह यांचा समावेश होतो. या संस्थेमध्ये इ.1 ली ते 08 वी चे 175 विदयार्थी आहेत. इ.9 वी ते इ.12 वी चे 163 विदयार्थी आहेत. असे एकूण 338 विदयार्थी आहेत.

**बालगृहातील बालकांचे शिक्षण :-**

बालगृहातील बालकांचे शिक्षण कोणताही खंड न पडता व्हावे, मुलांना विषयनिहाय मार्गदर्शन मिळावे म्हणून राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र पूणे यांच्या समता विभागाकडून खालील सूचना देण्यात आल्या आहेत.

1) बालकांची शैक्षणिक गुणवत्ता व स्तर तपासणे.

2) शिक्षण खंडित झालेल्या पालकांचे समुपदेशन करणे.

3) समूपदेशनासाठी जिल्हायातील समूपदेशकांची मदत घेणे.

4) बालकांना जीवनकौशल्य आत्मसात करण्याबाबत मार्गदर्शन करणे.

5) विधिसंघर्षग्रस्त बालकांसाठी ऑनलाईन कोर्सेस व विविध मुक्त शिक्षण याबाबत मार्गदर्शन करणे.

6) शैक्षणिक गुणवत्ता चांगली असणा-या बालकांना शिक्षण शिष्यवृत्ती बाबत मार्गदर्शन करणे.

7) बालगृहातील बालके शाळेत जात नसतील तर त्यांना शाळेत दाखल करणे.

8) बालगृहामध्ये दिक्षा ॲप्लीकेशनचा उपयोग करण्याबाबत मार्गदर्शन करणे.

बालगृहातील बालकांचे शिक्षण गुणवत्तापुर्ण व्हावे या करिता कोल्हापूर जिल्हयातील 11 बालगृहातील मुलांची माहिती प्राप्त करण्यात आली. यानुसार तालुकानिहाय बालगृह –

| क्र | तालुका | बालगृहाचे नाव | अधीक्षकांचे नाव |
|---|---|---|---|
| 1 | कागल | दि.कागल एज्यु. सोसायटी संचलित वाय. डी. माने बालगृह | श्री.बी.के.साळुंखे |
| 2 | कोल्हापूर | अनिकेत निकेतन बालगृह | श्री.पी.के.डवरी |
| 3 | कोल्हापूर | डॉ. सर्वपल्ली राधाकृष्ण मुलांचे निरीक्षणगृह/बालगृह 1 | श्री.एस.आर.माने |
| 4 | पन्हाळा | सौ.मिलीनी वालावलकर कन्या निरीक्षणगृह/बालगृह | श्री.अमोल दी. पाटोळे |
| 5 | हातकणंगले | श्री.दिलीपसिंह राजे घाडगे बालगृह | श्री.आर.बी.बिद्रेवाडी |
| 6 | कागल | भगवानबाबा शिक्षण प्रसारक मंडळ | श्रीम.ए.के.कांबळे |
| 7 | कोल्हापूर | जिल्हा परिविक्षा व अनुरक्षण संघटना संचलित शिशुगृह | श्रीमती. डी.ए.पाटील |
| 8 | कोल्हापूर | कै.अहिल्याबाई शं.दाभोळकर कन्या बालगृह | श्रीमती नजीरा नदाफ |
| 9 | कोल्हापूर | मानव संसाधन विकास मिशन कोल्हापुर संचलित बालगृह | श्रीमती. मीना कालकुंद्रे |
| 10 | करवीर | अवनी संस्था सांगली संचलित बालगृह | श्रीमती.तेजश्री सुतार |
| 11 | करवीर | डी.आर.माने महाविदयालय कागल संचलित मुलांचे निरीक्षणगृह | श्री.बनसोडे |

**कोल्हापूर जिल्हातील तालुकानिहाय बालगृहातील इयत्ता 1 ते 8 च्या मुलांची संख्या**

| अ.क्र. | तालुका | विदयार्थी संख्या |
|---|---|---|
| 1 | मनपा कोल्हापूर | 78 |
| 2 | कागल | 39 |
| 3 | हातकणंगले | 23 |
| 4 | करवीर | 12 |
| 5 | पन्हाळा | 175 |

**बालगृहातील मुले ज्या शाळांमध्ये प्राथमिक शिक्षण घेत आहेत त्या शाळांची यादी -**

| अ.क्र | तालुक्याचे नाव | शाळांची नावे | मुख्याध्यापकांचे नाव |
|---|---|---|---|
| 1 | करवीर | रामनगर शिये नं. 3 | श्रीम. कांबळे |
| 2 | पन्हाळा | कुमार वि.म.पन्हाळा | श्रीम. महाजन |
| 3 | पन्हाळा | पन्हाळा वि.म.पन्हाळा | श्रीम. जमदग्नी |
| 4 | हातकणंगले | शामराव पाटील यड्राव | श्रीम. कोहाने |
| 5 | हातकणंगले | नवचैतन्य विदया मंदीर इचलकरंजी | श्री. पुजारी |
| 6 | हातकणंगले | राणी लक्ष्मीबाई विदयामंदिर क्र.13 इचलकरंजी | श्री. पाटील |
| 7 | करवीर | रामचंद्र मसोजी महाडीक हाय.पुलाची शिरोली | श्री. पाटील |
| 8 | कागल | बॉईज अन्ड गर्ल्स हाय.मौजे सांगाव | श्रीम. माने |
| 9 | कागल | इंदिरानगर | श्रीम. मगदूम |
| 10 | कागल | तु.बा.नाईक | श्री. पाटील |
| 11 | म . न. पा . | म्यु. महाराणी ताराराणी विदयालय | श्री. शिंत्रे |
| 12 | म . न. पा . | न्यु.हाय.पेटाळा | श्री. पवार |
| 13 | म . न. पा . | इंदुमती देवी फॉर गर्ल्स हाय. | श्रीम. भोसले |
| 14 | म . न. पा . | इंदिरा गांधी विदयानिकेतन | श्रीम. मोहिते - पाटील |

| | | | |
|---|---|---|---|
| 15 | म . न. पा . | संदीपनी विदयासागर | श्री. गावडे |
| 16 | म . न. पा . | आदर्श प्रशाला कोल्हापर | श्री. पाटील |

**बालगृहातील बालकांच्या शिक्षणात शालेय नेतृत्वासमोरील आव्हाने :-**

बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क 2009 नुसार प्रत्येक बालकाला प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्यात आलेले आहे. या कायदयानुसार शिक्षक, मुख्याध्यापक, शाळा व्यवस्थापन समिती आणि पालकांची भूमिका देखील अधोरेखित केली आहे. पालकांनी मुलांच्या शिक्षणात खंड पडू देवू नये असा विचार या कायदयात केलेला आहे. तरी परंतु बालकांना सांभाळण्यासाठी व शिक्षणासाठी पालक असमर्थ असतील तर अशा बालकांसाठी बालगृह, शिशुगृह, खुले निवारागृह, निरीक्षण/विशेषगृह ची व्यवस्था केलेली असते. तसेच बाल सल्ला केंद्र, बाल संगोपन योजना, इ.च्या माध्यमातून सुविधांचा लाभ दिला जातो. ही मुले जेव्हा सामान्य शाळेत प्राथमिक शिक्षणासाठी प्रवेशित केली जातात तेव्हा शालेय नेतृत्वापुढे अपेक्षित शैक्षणिक यश प्राप्त होण्यासाठी अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते.

**बालगृहातील मुलांशी संबंधित आव्हाने** :-

1) बालगृहातील मुलांना शिक्षणाचे महत्व अवगत नसते. शिक्षणाची जाणीव नसणे हे शालेय नेतृत्वासमोर एक आव्हान असते.
2) बालगृहात मुलांमध्ये ब-याच वेळा अनुपस्थित रहाण्याचे प्रमाण वाढते मुलांना शाळेत आणणे व टिकवून ठेवणे हे नेतृत्वापुढे आव्हान असते.
3) बालगृहातील बालकांच्या अनुपस्थितीमुळे विषय निहाय अध्ययन निष्पत्तीची पूर्तता करण्याचे आव्हान शालेय नेतृत्वापुढे असते.
4) बालगृहातील बालकांसाठी आजच्या स्पर्धात्मक युगात आवश्यक असलेले पूरक वातावरण निर्माण करणे व टिकविणे हे शालेय नेतृत्वापुढे एक आव्हान असते.

**शिक्षकांशी संबंधित आव्हाने** :-

1) बालगृहातून प्राथमिक शिक्षणासाठी प्रवेशित झालेल्या मुलांबाबत जुळवून घेण्याची शिक्षकांची मानसिकता नसते.
2) सतत गैरहजर राहिल्यामुळे अध्ययन निष्पत्ती पूर्ण होण्यात अडचण येत असल्याने शिक्षकांकडून दुर्लक्ष होते अशा स्थितीत शाळेतील शिक्षकांशी संवाद साधून बालगृहातील अधिक्षक, बालकांचे पालक यांच्या बैठका घेण्यासाठी मुलांच्या शैक्षणिक समस्यावर चर्चा करण्यासाठी शिक्षकांना प्रवृत्त करण्याचे आव्हान नेतृत्वापुढे असते.
3) बालगृहातील बालकांच्या शिक्षणाबाबत शाळेतील शिक्षकांची मानसिकता बदलणे त्यांना सतत कार्यप्रवण ठेवण्यासाठी प्रेरणा देणे हे शालेय नेतृत्वापुढे मोठे आव्हान आहे.

**पालकांशी संबंधित आव्हाने** :-

1) बालसुधार गृहातील बालकांच्या अशिक्षित /निरक्षर पालकांचा दृष्टीकोन बदलणे हे शालेय नेतृत्वापुढे आव्हान असते.कौटुंबिक अडचणींमुळे मुलांच्या शिक्षणाविषयी पालकांची अनास्था असते.जे पालक मुलांचे संगोपन व शिक्षण पूर्ण करू शकत नाही अशी बालके बालगृहात आश्रय घेतात अशा स्थितीत पालक मुलांच्या अभ्यासाकडे लक्ष देत नाहीत. शालेय नेतृत्वापुढे पालकांचे मतपरिवर्तन करून मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात ठेवणे हे आव्हान ठरते.

**समाजाशी संबंधित आव्हाने** :-

1) बालगृहातील बालकांच्या शिक्षणासाठी समाजाचा सहभाग मिळवणे शक्य होत नाही.
2) बालगृहातील बालकांच्या शिक्षणाबाबत अनास्था दिसून येते. लोकांकडून शाळेला अपेक्षित सहकार्य मिळत नाही. अशावेळी शालेय नेतृत्वाला गुणवत्तापूर्ण काम करणे हे एक आव्हान असते.

**बालगृहातील बालकांच्या शिक्षणात यशस्वी शालेय नेतृत्वाचा अभ्यास :-**

बालगृहातील बालकांचे शिक्षण पूर्ण करताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते अशा प्रतिकूल परिस्थीतीत आपल्या नेतृत्वाचा यथायोग्य वापर करून मुख्याध्यापक व शिक्षक आपली शाळा यशोशिखरावर घेऊन जाण्यात यशस्वी होताना दिसून येतात महाराष्ट्रातील बालगृहातील बालकांचे शिक्षण अशा यशस्वी शालेय नेतृत्वाची यशोगाथा आपण अभ्यासणार आहोत. अनेक अडथळे पार करत त्यांनी केलेला प्रवास खरोखरच प्रेरणादायी आहे यातून प्रेरणा घेऊन आपणही आपले नेतृत्व विकसित करून आपली शाळा प्रगतीपथावर घेऊन जाण्यास कृतीप्रवण व्हाल ही अपेक्षा आहे.

**यशोगाथा**
**प्राथमिक शाळा इंदिरानगर, मौजे सांगाव**
**तालुका - कागल जिल्हा कोल्हापूर**
**सौ. सुवर्णा रामगोंडा मगदूम**

प्राथमिक शाळा इंदिरानगर, मौजे सांगाव तालुका - कागल जिल्हा कोल्हापूर 27 वर्षे सौ. सुवर्णा मगदूम यांचा मुख्याध्यापक या पदाचा अनुभव आहे .सध्या त्यांच्या शाळेची पटसंख्या 208 आहे त्याचबरोबर शाळेत येणाऱ्या इ.1 ली ते 7 वीच्या बालगृहातील मुलांची संख्या 10 आहे.ही मुले वाय.डी.माने बालगृह, कागल व निरीक्षण बालगृह कागल मधून शाळेत येतात यात इ.5 वी मध्ये 02 मुले , इ.6 वी मध्ये 03 मुले इ.7 वी मध्ये 05 मुले अशी 10 मुले शाळेत शिकत आहेत शाळेत मुले गैरहजर रहातात म्हणून स्वत:सौ. मगदूम यांनी बालगृहातील अधीक्षक श्री.साळुंखे बी.के.यांचेशी संपर्क साधला स्वत: बालगृहाला भेट देवून मुलांना शाळेत उपस्थित रहाण्याबाबत प्रोत्साहन व प्रेरणा दिली. सर्वप्रथम सौ. मगदूम यांनी शाळेतील शिक्षकांची बैठक घेतली. बैठकीत बालगृहातील बालकांच्या अध्ययनावर चर्चा केली. तसेच या मुलांची भावनिकता सांभाळून अभ्यासात मागे रहाणा-या मुलांसाठी नियोजन केले.याकरिता जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, कोल्हापूर या संस्थेचे शैक्षणिक मार्गदर्शन देखील घेतले. त्यामुळे बालगृहातील बालकांची अनुपस्थिती का असते? मुले भाषा व गणित विषयात मागे का आहेत? मुलांना शाळेत यावेसे का वाटत नाही? मुले शाळेत अनुपस्थित रहाण्याची कारणे कोणकोणती आहेत? याची एक पडताळा सूची केली सर्वेक्षण केले. त्यांची बालगृह निहाय यादी बनवली. दररोज शाळेतील स्टाफला बालगृह भेटीला पाठवले. सुरूवातीला बालगृहातील प्रशासन व अधीक्षक यांनी फारसा समाधानकारक प्रतिसाद दिला नाही. मात्र दररोज शाळेतील शिक्षक येतात. संवाद साधतात. बालगृहातील बालकांची आपुलकीने चौकशी करतात, तसेच शैक्षणिक साहित्य पुरविण्याचे काम देखील करतात.शाळेमध्ये शिकण्याचे महत्व समजून सांगतात. अतिशय खेळी मेळीच्या वातावरणात मुलांशी आंतरक्रिया करतात. त्यामुळे या बालकांची भावनिकता जपली जाऊन एक प्रकारची आपुलकी, जिव्हाळा आणि स्नेहबंध जोडायला सुरूवात झाली सौ. मगदूम मॅडम यांनी तर तालुका आणि जिल्हास्तरावर होणा-या सर्व बैठकांमध्ये सक्रिय सहभाग घेतला होता, त्यांनी बालगृहातील बालकांच्या शिक्षणाविषयी सर्व माहिती देखील घेतली होती. स्वतः मुख्याध्यापक या विषयाबाबत जागरूक आहेत ही बाब आदर व विश्वासास पात्र ठरली. सौ. मगदूम मॅडम यांनी शाळेत बालगृहातील बालकांच्या पालकांची बैठक घेतली. शाळेतील शिक्षकांचे योगदान घेण्यात देखील त्या यशस्वी झाल्या.

बालगृहातील बालके शाळेत आनंदाने का येत नाही? भाषा व गणित विषयात ही मुले मागे का रहातात? शाळेतील शैक्षणिक सुविधा व भौतिक सुविधांचा अभाव असणे या सर्व बाबी सौ. मगदुम यांच्या पुढील दिशेला मार्गदर्शक ठरल्या. सौ.मगदुम यांनी बालगृहातील बालकांना शिक्षणविषयक सर्व सुविधांची यादी शाळेतील शिक्षकांच्या मदतीने केली. शाळेतील सर्वच शिक्षकांनी आवर्जुन सहभाग नोंदवला.बालगृहातील बालकांच्या शिक्षणाबाबत सौ. मगदूम यांनी खालील बाबींची पुर्तता केली.

**1) लॉकडाऊनमध्ये बालगृहातील बालकांच्या अभ्यासात सातत्य :-**

इ.5वी ते 7वी च्या विदयार्थ्यांसाठी कोविड 19 च्या काळात बालगृहात जाऊन प्रत्यक्ष अध्यापनाची व्यवस्था केली.

**2) शाळेतील बालगृहातील बालकांच्या अभ्यासाचे नियोजन :-**

अध्ययन स्तर पडताळणी झाल्यानंतर भाषा व गणित शिक्षक तसेच शाळेतील बालरक्षकाच्या मदतीने बालकांच्या अभ्यासाचे नियोजन केले.

**3) BRC साधन व्यक्तींची मदत :-**

अध्ययन स्तर पडताळणीनंतर कृती कार्यक्रम अंमलबजावणीसाठी कागल पं.स.मधील BRC साधनव्यक्तींची मदत बालगृहातील बालकांचा अध्ययन स्तर वाढवण्यासाठी घेण्यात आली.

**4) भाषा/ गणित अध्यापन वेळापत्रक :-**

शाळेतील शिक्षक, BRC साधनव्यक्ती प्रज्ञा पाटील व अंजली ढाले यांनी शाळेच्या वेळेत आणि शाळेच्या वेळेव्यतिरिक्त करावयाच्या अध्यापनाचे सूक्ष्म वेळापत्रकच तयार केले आणि ते कटाक्षाने पाळले.

**5) भिंतीबाहेरची शाळा :-**

बालगृहातील बालकांना शाळा आपली वाटावी. शाळेत ही मुले रमावीत. आनंददायी वातावरणात शिकावीत म्हणून चार भिंतीच्या बाहेर हसत खेळत शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली.

**6) भाषापेटीचा वापर :-**

मराठी भाषा शिकण्यासाठी शब्दसंग्रह, वाचन आकलन नीट व्हावे, वाचनात ओघवतेपणा यावा लिखीत स्वरूपात अभिव्यक्ती यावी, वाचनाकडे मुलांचा कल वाढावा म्हणून भाषापेटीचा वापर केला.

**7) गणित पेटीचा वापर :-**

संख्याज्ञान, संख्येवरील क्रिया, मापन, आकार संकल्पना, नमुना संरचना याचा वापर करून गणिताचा पाया रचण्यासाठी गणित पेटीचा वापर केला.

**8) स्वनिर्मित साहित्याचा वापर :-**

भाषा व गणित विषयात मुले अंतिम/पुढच्या स्तरापर्यंत जावीत यासाठी शाळेतील शिक्षकांना जास्तीत जास्त स्वनिर्मित साहित्य निर्मितीसाठी प्रोत्साहन व प्रेरणा दिली.

**9) बालगृह भेट :-**

बालगृहांना भेटी देवून बालकांच्या अडचणी समजून घेवून त्यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न केला.

**10) बालगृहातील अधिक्षक बैठक :-**

बालगृहातील बालकांच्या शिक्षणात सातत्य टिकून रहावे याकरिता अधीक्षक यांचेमार्फत बैठक घेऊन मैत्रीपुर्ण वातावरणात तयार केले.

**11) दत्तक मित्र :-**

वर्गातील हुशार मुलांबरोबर बालगृहातील बालकांची जोडी लावून दत्तक मित्र उपक्रमाच्या माध्यमातून भाषा व गणित विषयातील गोडी वाढवण्याचा प्रयत्न केला.

**12) बालगृहातील बालकांचे शैक्षणिक पालकत्व :-**

बालगृहातील बालकांना लागणारे शैक्षणिक साहित्य उपलब्ध व्हावे या करिता शाळेतील शिक्षक,समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती, युवक यांच्या माध्यमातून पालकत्व स्वीकारण्याचा आग्रह धरला.

**13) आरोग्य तपासणी :-**

व्यक्तीगत पातळीवर समाजाच्या सहभागाव्दारे बालगृहातील बालकांचे कॅल्शीअम, रक्तगट, दंत चिकित्सा इ.साठी प्रयत्न केले.

**14) क्षेत्रभेट/वनभोजन :-**

मुलांना आनंद मिळावा. मोकळया वातावरणात मुले खुलावीत. मुले समाजाभिमुख व्हावी. आपलेपणा वाढावा म्हणून सर्वांच्या सहकार्याने क्षेत्रभेट/वनभोजनाचे आयोजन केले.

**15) शाळा व्यवस्थापन समिती सहभाग :-**

बालगृहातील बालकांच्या शिक्षणासाठी शाळा व्यवस्थापन समितीचा सक्रिय सहभाग घेतला.

**16) फोन संवाद :-**

वेळ प्रसंगी बालकांचे पालक, अधीक्षक यांच्याशी फोन संवाद साधून बालगृहातील बालकांच्या सातत्यपूर्ण शिक्षणासाठी आग्रह धरला.

**शाळेतील अन्य गुणवत्तापूर्ण कार्यक्रमांचा अहवाल खालील प्रमाणे आहे -**

1) शाळेतील मुलांचा व्यक्तिमत्व विकास व्हावा म्हणून विविध स्पर्धांच्या आयोजनावर भर दिला जातो.

2) अध्ययन अक्षम मुलांसाठी वाचन लेखन वर्ग घेतले जातात.

3) थोर नेत्यांची जयंती, पुण्यतिथी, निबंध स्पर्धा, भाषÖ स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, गीतगायन स्पर्धा, प्रश्नमंजुषा, रांगोळी स्पर्धा यासारख्या स्पर्धामधून मुलांचा आत्मविश्वास वाढवला जातो.

4) शाळेतील शिक्षकवृंद रविवारी किंवा इतर सुटटीच्या दिवशी देखील शाळेत शैक्षणिक योगदान देतात.

5) स्वत:च्या वाढदिवसाचे औचित्य साधून बालगृहातील बालकांना शैक्षणिक साहित्यांचे वाटप करतात.

6) शाळेत सर्व शासकीय उपक्रमांची कार्यवाही नेटाने केली जाते.

इंदिरानगर हा भाग बेघर वसाहत आहे. येथील लोक मोलमजुरी, रोजंदारी वरील छोटे - छोटे व्यवसाय व मिळेल ते काम करतात. अशा भागात आपल्या शाळेचे अस्तित्व टिकवण्यासाठी व समाजाचा कोणताही सहभाग नसताना केवळ शैक्षणिक गुणवत्ता, मुलांचा सर्वांगीण विकास यासांठी सौ. मगदूम कटिबदध आहेत. अत्यंत प्रामाणिकपणे शाळेत उपक्रम राबविणे व शिक्षक वृंदाच्या मदतीने सतत कार्यरत रहाणे यासाठी तत्पर असतात.कागल तालुक्यात आदर्शवत शाळेचा नावलौकिक आहे. सौ.मगदूम या त्यांच्या कार्यकतृत्वामुळे आदर्श् मुख्याध्यापक म्हणून 2018,2019 व 2021 च्या मानकरी ठरल्या आहेत. शाळेला यश मिळवून देवून शालेय नेतृत्व सिदध करणा-या सौ. मगदूम यांचे कार्य निश्चितच प्रेरणादायी आहे.




**प्राथमिक शाळा इंदिरानगर, मौजे सांगाव तालुका - कागल जिल्हा कोल्हापूर क्षणचित्रे**

**बालगृहातील बालकांच्या शिक्षणात जिल्हा नेतृत्वाची भूमिका :-**

''सामान्य शाळेतील मुले शाळा सुटल्यानंतर आपापल्या घरी जातात बालगृहातील मुले शाळा सुटल्यानंतर बालगृहात जातात. या मुलांसाठी पालक आपण व्हायचं आहे या मुलांच्या भावविश्वात शिरून शैक्षणिक गुणवत्ता वाढवायचा प्रयत्न करायचा आहे''. (मा.डॉ.आय.सी.शेख प्राचार्य जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,कोल्हापूर) यांचे उदबोधन झाले, निमित्त होतं, 29 सप्टेंबर 2021 रोजी झालेल्या बालगृहातील बालकांच्या शैक्षणिक गुणवत्ता व अध्ययन स्तर तपासणीसाठीच्या नियोजनाचं. मा.डॉ.आय.सी.शेख यांनी डाएट कोल्हापूरचा प्राचार्य म्हणून पदभार स्वीकारताच अनेक कामांना/ विषयांना गती दिली त्यातील एक संवेदनशील काम म्हणजे बालगृहातील बालकांचे शिक्षण होय प्रशासकीय नेतृत्व करताना या नेतृत्वाला बालगृहातील बालकांच्या शिक्षणाची अंमलबजावणी करताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. अगदी रविवार सुटटीचा दिवस असून देखील पूर्णवेळ बालगृहातील बालकांच्या या शिक्षणासाठी आढावा घेतात, बैठका घेणं, भेटी देणं या कामातून बालगृहातील बालकांकडे पहाण्याचा दृष्टीकोनच बदलून

टाकला आहे. प्रतिकूल परिस्थीतीतही आपल्या प्रशासकीय नेतृत्वाचा यथायोग्य वापर करून डॉ. शेख यांनी कोल्हापूर जिल्हयातील शैक्षणिक गुणवत्तेला यशोशिखरावर नेण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे.

**कोल्हापूर जिल्हयात प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, कोल्हापूर यांनी बालगृहातील बालकांच्या शिक्षणात केलेल्या कामकाजाचा अहवाल -**

बालगृहातील बालकांच्या शिक्षणासाठी कोल्हापूर जिल्हयातील गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख्, साधनव्यक्ती, विशेष तज्ञ, विशेष शिक्षक, बालरक्षक तसेच संस्थेतील वरिष्ठ अधिव्याख्याता, अधिव्याख्याता, विषय सहाय्यक, बालगृहातील अधीक्षक, शाळेतील मुख्याध्यापक यांना एकत्रित आणून बालगृहातील बालकांच्या शिक्षणाची प्रभावी अंमलबजावणी होण्याकरिता अचूक नियोजन व व्यवस्थापन केले.

1) **इ.9 वी ते 12 वी साठी व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन :-** जिल्हयातील 25 समुपदेशनच्या मदतीने 163 विदयार्थ्यांसाठी दि. 9 ऑगस्ट 2021 रोजी व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन उपलब्ध करून देण्यात आले.
2) **इ.1ली ते 8 वी साठी अध्ययन स्तर निश्चिती :-** साधनव्यक्तीच्या मदतीने इ.1 ली ते 8 वी च्या 175 मुलांचे भाषा व गणित विषयाचा अध्ययन स्तर निश्चिती करण्याचे नियोजन 29 सप्टेंबर 2021 रोजी करण्यात आले.
3) **अध्ययन स्तरावर आधारित कृती कार्यक्रम :-** 12 नोव्हेंबर 2021 ते 31 मार्च 2022 अखेर कृती कार्यक्रम राबविण्यावे नियोजन करण्यात आले.
4) **BRC साधनव्यक्तीवर जबाबदारी :-** 27/12/2021 च्या बैठकीत बालगृहातील बालकांसाठी भाषा व गणित विषयाच्या कृती कार्यक्रम अंमलबजावणीसाठी **BRC** साधनव्यक्तीवर जबाबदारी सोपविण्यात आली.
5) **अधीक्षक बैठक :-** 31/12/2021च्या बैठकीत बालगृहातील बालकांकरिता अध्यापनास येणा-या सुलभकांना सुविधा पुरविण्याबाबत सूचना देण्यात आल्या
6) **व्हाटसअपव्दारे आवाहन :-** LINK च्या माध्यमातून दि.23/12/2021 रोजी बालगृहातील बालकांच्या अध्यापनासाठी आवाहन करण्यात आले. याकरिता काही बालरक्षक शिक्षकांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.
7) **मुख्याध्यापक बैठक:-** 15/01/2022 रोजी बालग्रुहातील मुले ज्या सामान्य शाळेत शिक्षण घेत आहेत त्या शाळेतील मुख्याध्यापकांची **ONLINE** बैठक घेण्यात आली. शाळास्तरावर नियोजन व अंमलबजावणीच्या सूचना देण्यात आल्या.
8) **पालक अधिकारी यांच्या शाळाभेटी :-** 07/01/2022रोजी संस्थेतील अधिका-यांनी शाळाभेटी देवून बालगृहातील बालकांची भाषा व गणित विषयाची सदय:स्थिती,कृती कार्यक्रम अंमलबजावणी , प्रत्यक्ष पाहिली बघितली व मुख्याध्यापक, शिक्षक व विदयार्थी यांचेशी संवाद साधला. एक कर्तव्यदक्ष, कार्यतत्पर व संवेदनशील अधिकारी म्हणून कोल्हापूर जिल्हयात अनेक गुणवत्तापुर्ण उपक्रमांची हाताळणी डॉ.शेख यांनी केली आणि पर्यवेक्षकीय यंत्रणेचा बालगृहाकडे व बालगृहातील बालकांकडे पाहाण्याचा दृष्टीकोनच बदलून टाकला आहे.

**प्रभावी परिणामकारक नेतृत्व सिध्द करणा-या डॉ.शेख यांचे कार्य मोलाचे आणि प्रेरणादायी आहे.**



**दि.२८/०९/२०२१ रोजी बालगृहातील बालकांची शैक्षणिक गुणवत्ता व अध्ययनस्तर नियोजन बैठक**

| अ.क्र. | तालुक्याचे नाव | शाळेचे नाव | पालक अधिकारी |
|---|---|---|---|
| 1 | करवीर | रामनगर शिये नं. 3 | श्रीम. राणीताई पाटील |
| 2 | पन्हाळा | कुमार वि.म.पन्हाळा | डॉ. अंजली रसाळ |
| 3 | पन्हाळा | पन्हाळा वि.म.पन्हाळा | डॉ. अंजली रसाळ |
| 4 | हातकणंगले | शामराव पाटील यड्राव | डॉ. अंजली रसाळ |
| 5 | हातकणंगले | नवचैतन्य विदया मंदीर इचलकरंजी | श्री. रमेश कोरे |
| 6 | हातकणंगले | राणी लक्ष्मीबाई विदयामंदिर क्र.13 इचलकरंजी | श्री. विजयकुमार भिसे |
| 7 | करवीर | रामचंद्र मसोजी महाडीक हाय.पुलाची शिरोली | श्री. संजय कुमार नवले |
| 8 | कागल | बॉईज ॲन्ड गर्ल्स हाय.मौजे सांगाव | श्रीम. रेणुका जाधव |
| 9 | कागल | इंदिरानगर | श्री. रमेश कोरे |
| 10 | कागल | तु.बा.नाईक | श्रीम. रेणुका जाधव |
| 11 | म . न. पा . | म्यु. महाराणी ताराराणी विदयालय | श्रीम. राणीताई पाटील |
| 12 | म . न. पा . | न्यु.हाय.पेटाळा | श्रीम. वैशाली पाटील |
| 13 | म . न. पा . | इंदुमती देवी फॉर गर्ल्स हाय. | श्रीम. सरिता कुदळे |
| 14 | म . न. पा . | इंदिरा गांधी विदयानिकेतन | डॉ. अंजली रसाळ |
| 15 | म . न. पा . | संदीपनी विदयासागर | श्री. राजेंद्र कांबळे |
| 16 | म . न. पा . | आदर्श प्रशाला कोल्हापर | श्री. चंद्रहास हिप्परकर |

**बालगृहातील बालकांची शैक्षणिक गुणवत्ता व अध्ययन स्तर – साधन व्यक्ती / शिक्षक / बलक्षक भेटीचे नियोजन**

| अ.क्र | तालुक्याचे नाव | साधनव्यक्ती/ शिक्षक / बालरक्षक |
|---|---|---|
| 1 | करवीर | श्रीम. सुक्रांती भागवत , श्रीम. मनीषा जाधव, श्रीम. श्रीप्रभा कांबळे |
| 2 | पन्हाळा | श्रीम. संगीता जाधव, श्री. गोपालकृष्ण कालेकर |
| 3 | हातकणंगले | श्रीम. पूजा कांबळे, श्री. आबाजी कांबळे, श्रीम. मनीषा भोसले |
| 4 | कागल | श्रीम. प्रज्ञा पाटील, श्रीम. अंजली ढाले |
| 5 | म . न. पा . | श्री. श्रावण कोकितकर, श्रीम. आस्मा गोलंदाज, श्रीम. अर्चना काटकर, श्रीम. अदिती जाधव, श्री. विक्रम भोसले, श्रीम. सारिका पाटील, श्रीम. प्रियांका साजने |




**बालगृहातील बालकांची शैक्षणिक गुणवत्ता व अध्ययन स्तर – पालक अधिकारी व साधनव्यक्ती बालगृह भेट.**

**बालगृहातील बालकांच्या शिक्षणात राज्य नेतृत्वाची भूमिका -**

दि.14 फेब्रुवारी 2022 रोजी मा.संचालक देवेंद्र सिंह (राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण महाराष्ट्र,पुणे) यांनी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,कोल्हापूर येथे आकस्मिक भेट दिली. या भेटीत संस्थेतील अनेक उपक्रमाबरोबरच बालगृहातील बालकांसाठी संस्था करत असलेल्या कार्याबाबत माहिती घेतली.जिल्हातील 11 बालगृहातील १७५ विद्यार्थ्यांसाठी भाषा व गणित विषयाच्या अध्ययनस्तराच्या निश्चितीबाबत तसेच या विद्यार्थ्यांना पालक अधिकारी व विषय साधनव्यक्ती, शिक्षक बालरक्षक यांच्या कडून होत असलेल्या भेटी व मार्गदर्शन याविषयी माहिती करून घेतली.

बालगृहातील बालकांच्या आरोग्यविषयक सर्वेक्षण , आरोग्य तपासणी व उपचार याबाबत काम हाती घेणे विषयी सूचना दिल्या.बालगृहात आलेली मुले भावनिक दृष्टया स्थिर नसतील तर याचा परिणाम त्यांच्या आरोग्यावर होवू शकतो.पर्यायाने या मुलांच्या शैक्षणिक प्रगतीवर देखील परिणाम होवू शकतो याची जाणीव करून दिली.मा.संचालक यांच्या सूचनेनुसार बालगृहातील बालकांच्या आरोग्य विषयक जागृतीकरिता नियोजन करण्यात येत आहे.



**मा.संचालक देवेंद्र सिंह (राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण महाराष्ट्र,पूणे) यांची जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,कोल्हापूर येथे भेट व मार्गदर्शन**

**उपक्रमामधून बालगृहातील मुलांमध्ये झालेले बदल**
१.मुलांचे उपस्थितीचे प्रमाण वाढले. २.अध्ययन स्तर पडताळणी मुळे भाषा व गणित विषयात मागे राहिलेल्या मुलांना अध्ययन स्तराच्या शेवटच्या टप्प्यावर आणता आले. ३.मुले शाळेतील विविध उपक्रमामध्ये सक्रीय सहभाग घेऊ लागली. ४.मुलांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला. समता विभागप्रमुख म्हणून बालगृहातील बालकांच्या शिक्षणासंदर्भातील कामकाजाची जबाबदारी माझ्याकडे आली. या दरम्यान बालगृहाना भेटी देणे, अधीक्षकांच्या बैठका घेणे, मुलांशी संवाद साधणे या गोष्टी करता आल्या. या मुलांचा अध्ययन स्तर निश्चित करून यंत्रणेच्या मदतीने कृती कार्यक्रमाचे आयोजन करून मुलांना भाषा व गणित विषयामध्ये अध्ययन स्तराच्या शेवटच्या टप्प्यापर्यंत आणता आले. याचे नितांत समाधान व आनंद आहे.

**चला तर, चिंतनात्मक प्रश्नावर थोडा विचार करू या.**

1) बालगृहातील बालके शाळेत अनुपस्थित रहाण्याबाबत सौ.मगदूम मॅडम यांना आलेल्या समस्यांची यादी करा.

२) सौ.मगदूम यांनी बालगृहातील बालकांच्या भाषा व गणित विषयाबाबत घडवून आणलेल्या बदलांची यादी करा.

३) बालगृहातील बालकांच्या शिक्षणात शाळांमध्ये कोणत्या नेतृत्व कौशल्याची गरज आहे असे
आपणास वाटते.

४) बालगृहातील बालकांना शिक्षण देण्याची संधी तुम्हाला प्राप्त झाली तर तुमच्या कामाचे स्वरूप कसे असेल थोडक्यात लिहा

**थोडासा विचार, थोडीशी चर्चा करू या**

१) बालगृहातील बालकांच्या शिक्षणाविषयी कमालीची अनास्था दिसून येते त्यामुळे अध्ययन स्तर निश्चित करून अपेक्षित संपादणूक पातळी गाठताना अडचणी येतात अशा शाळेच्या ठिकाणी बदलीने रूजू झाल्यास आपण काय कराल

२) कौटुंबिक समस्या,भावनिक समस्या, शैक्षणिक समस्या व समायोजनाच्या अभावी बालगृहातील बालकांना शिक्षण प्रवाहात आणण्यासाठी मुख्याध्यापक म्हणून कोणते उपाय योजाल?

**बालगृहातील बालकांच्या शिक्षणासंदर्भात असेही करता येईल.**

- बालगृहातून सामान्य शाळेत शिक्षणासाठी येणा-या इ १ ली ते ८ वी च्या विदयार्थ्यांची वैयक्तिक माहिती, शैक्षणिक माहिती तसेच कौटूंबिक पार्श्वभूमीची माहीती बालगृहातील पाखरे अशा शीर्षकासह रजिस्टर मध्ये नोंद करता येईल.
- बालगृहातील मुले शाळेत उपस्थित रहाणारे व न रहाणारे असे वर्गीकरण करता येईल.
- बालगृहातील बालकांविषयी शाळा व्यवस्थापन समितीस अवगत करता येईल.
- शाळेतील अनियमितपणा दूर करण्यासाठी बालगृह भेटीचे आयोजन करता येईल.
- बालगृह भेटी नंतर अधीक्षक बैठक, पालक सभा, विदयार्थ्यांसाठी विविध गुणदर्शन इ.चे आयोजन करता येईल.
- बालगृहातील बालकांच्या शिक्षणाबाबत शाळेतील शिक्षक,मुख्याध्यापक यांनी SMC/SMDC समिती, ग्रामस्थ, बालगृह व्यवस्थापक आणि पालक यांच्याशी संवाद साधता येईल.
- बालगृहातील बालकांच्या शिक्षणाबाबत दृष्टीकोन बदलासाठी प्रयत्न करता येईल ..
- इयत्ता ५ ते ८ वी मध्ये शिष्यवृत्तीत विशेष प्राविण्य संपादन करणाऱ्या बालगृहातील मुलांचा सत्कार करता येईल.
- SMC/SMDC सामाजिक संस्था,पालक,ग्रामस्थ गावातील इतर क्षेत्रात काम करणारे अधिकारी,कर्मचारी यांचेशी सहकार्याचे संबंध प्रस्थापित करता येतील,त्यांच्या शालाब्जेतीचे आयोजन प्रेरणा भेटी म्हणून करता येईल.

**बालगृहातील बालकांच्या संदर्भांत शासकीय योजना :-**

१) दि ८ मार्च २०२१ रोजी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,महाराष्ट्र ,पुणे यांच्या समता विभागाने प्रसिदध केलेल्या परिपत्रकानुसार बालगृहातील बालकांच्या शिक्षणाकडे लक्ष वेधले आहे.

२) मा. जिल्हाधिकारी व उपमुख्य कार्यकारी अधिकारी एकात्मिक बाल विकास यांच्या माध्यमातून बालगृहातील बालकांपर्यंत पर्यवेक्षीय यंत्रणेला पोचण्याच्या सूचना दिल्या आहेत.

३) बालगृहातील बालकांच्या शिक्षणविषयक उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी व्हावी म्हणून जिल्हा स्तरावर समितीची रचना करण्यात आली आहे.

४) जिल्हास्तर, तालुकास्तर बैठकांचे आयोजन **online/offline** करण्यात आले.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने मुलांच्या संदर्भात केलेला विचार**

- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० चा आढावा घेतला असता विदयार्थ्यांच्या दृष्टीने शालेय शिक्षणाच्या महत्वाच्या उदिष्टांपैकी खालील महत्वाची उदिदष्टे, तत्वे दिलेली आहेत. सर्व स्तरावरील शिक्षणामध्ये सर्वांना वैश्विक प्रवेश व त्यांना शिक्षण प्रवाहात टिकवून ठेवणे सन २०३० पर्यंत ३ ते १८ वयोगटातील सर्व मुलांना मोफत व सक्तीच्या दर्जेदार शालेय शिक्षणात प्रवेश मिळवून शिक्षणामध्ये त्यांचा सहभाग घेणे.
- विदयार्थ्यांच्या अशैक्षणिक व शैक्षणिक क्षेत्राती विकासास चालना देण्यासाठी तसेच बालकांना, पालकांना संवेदनशील बनवून प्रत्येक विदयार्थ्यांची अव्दितीय क्षमता शोधणे आणि वृदिधंगत करणे.
- सन २०३० पर्यंत विविध उपाययोजनांच्या माध्यमातून पूर्व प्राथमिक शाळा पासून माध्यमिक शिक्षणापर्यंत १००% पटनोंदणी साध्य करायची आहे.
- शाळेतील मुलांच्या प्रवेशात वाढ करणे. शाळेत ये- जा करण्यासाठी दळणवळण सेवा व वसतिगृहाची सेवा आवश्यकतेनुसार उपलब्ध करून देणे अशा उपाययोजना मधून शालेय प्रवेशाची दरी कमी करण्याचा मानस आहे.
- शाळेत प्रवेश घेतलेल्या मुलांच्या दैनंदिन उपस्थितीचा व अध्ययन निष्पती चा आढावा घेणे तसेच शिक्षक, समाजसेवक व स्वयंसेवीसंस्था यांच्यामार्फत शाळेतून गळती होणा-या व शाळेत न येणा-या मुलांच्या संख्येवर पाळत ठेवली जाईल आणि शाळेबाहेरील पौंगडावस्थेतील मुलांसाठी कार्यक्रम म्हणून मुलांचा शालेय शिक्षणातील सहभाग, अध्ययन वाढविणे ,औपचारीक व अनौपचारीक शैक्षणिक माध्यमातून अध्ययनाचे वेगवेगळे मार्ग उपलब्ध करून जातील आणि सोबतच खुले शालेय शिक्षण**(open schooling)** व दूरस्थ शिक्षण **(distance schooling)** व तंत्रज्ञानाची साधने यांचे सबलीकरण करण्यात येईल.
- २०३० पर्यंत सर्व लिंगाच्या व सामाजिक वर्गवारी च्या सर्व भागांमध्ये समानता असावी या उददेशाने एक सर्वसमावेशक व न्याय शिक्षण प्रणाली अस्तित्वात आणणे.
- वंचित घटकातील विदयार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती,साधने व सुविधा विकसित केल्या जातील.
- शहरी भागातील गरीब कुटूंबातील विदयार्थ्यांना योग्य जीवनमान मिळावे यासाठी त्यांना शिक्षण प्रदान करणे मुली, दिव्यांग तसेच तृतीयपंथी मुलांना शिक्षण प्रदान करणे.

**12) राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये (NEP 2020) निर्देशित केलेल्या शिफारशी**

- जन्म व कौटूंबिक पार्श्वभूमी यांच्याशी निगडीत परिस्थिती मुळे कोणतेही मूल शिकण्याच्या व प्रगतीच्या एकाही संधीला मुकणार नाही, याची हमी देण्याची शिफारस **NEP 2020** करते.
- मुलांच्या शिक्षणासाठी अनेक नियोजित उपाययोजना अंतर्भूत केल्या आहेत तसेच विशेष शिक्षण झोन उभारण्याची शिफारस देखील या धोरणामध्ये केली आहे.
- सर्व स्तरावरील शिक्षणामध्ये सर्वांना वैश्विक प्रवेश मिळावा व त्यांना शिक्षण प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी **RTE 2009** या कायदयाचा विस्तारकरून शाळापूर्व ते इ१२ वी पर्यंत मोफत व सक्तीचे शिक्षण (वय वर्ष ३ ते १८ वर्ष) उपलब्ध करून देण्याची शिफारस आहे.

**NEP 2020 च्या अनुषंगाने मोडयूल संदर्भात मुलांचे शिक्षण**

उपेक्षित, वंचित विदयार्थ्यांवर विशेष लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.शिक्षण हे समता सुनिश्चित करण्याचे उत्तम माध्यम आहे. ज्याव्दारे समाजात समानता, समावेशकता आणि सामाजिक,आर्थिक गतिशिलता मिळू शकते. या

दृष्टीने **NEP2020** मधील भाग **- 1** च्या प्रकरण ६ मध्ये समन्यायी आणि सर्वसमावेशक शिक्षण सर्वांसाठी चा समावेश करण्यात आला आहे.

सामाजिक आणि आर्थिक दृष्टया वंचित गटातील **(SEDGS)** करिता त्यांच्या वर्तमानात आणि भविष्यकाळातील पिढयांचा शैक्षणिक स्तर उंचावणे.

**बालगृहातील बालकांचे शिक्षण व शालेय नेतृत्वाची भूमिका या मोडयूलची शालेय नेतृत्वाच्या दृष्टीकोनातून भूमिका:-**

मार्च २०२१ च्या राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद , महाराष्ट्र ,पूणे यांच्या समता विभागाने परिपत्रक प्रसिदध केले.यानुसार कोल्हापूर जिल्हयातील ११ बालगृहातील बालकांच्या शिक्षणासाठी काम करण्यात आले. ज्यात बालगृहाची माहिती घेणे, अधीक्षकांची भूमिका समजावून देणे, बालकांसाठी काम करणा-या पर्यवेक्षिय यंत्रणेला प्रोत्साहन देणे, शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक व विदयार्थी यांच्यामध्ये सकारात्मक दृष्टीकोन विकसित करण्यात आला. या सर्व अभ्यासातूनच मोडयुलची निर्मिती झाली.याचा फायदा नक्कीच नेतृत्व विकासाच्या वाटचालीस होईल.

- बालगृहातील बालकांची शैक्षणिक गुणवत्ता व अध्ययन स्तर निश्चिती.
- अध्ययन स्तर निश्चितीनतंर कृती कार्यक्रम देवून त्यांची अंमलबजावणी.
- व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन संधीची उपलब्धता
- शिष्यवृत्ती मार्गदर्शन
- बालगृहातील मुले शाळेत जात नसतील तर त्यांना शाळेत दाखल करणे.

**समारोप -**

शिक्षण क्षेत्रात काम करताना अनेक विपरित व प्रतिकूल परिस्थीतीतून नेतृत्वाला मार्ग काढावा लागतो. विदयार्थ्यांना शाळेत आणणे, शिकविणे आणि टिकविणे त्याच बरोबर गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे हे सामर्थ्य सक्षम नेतृत्वाकडे असते. शाळेचा नेता म्हणून काम करत असताना शालेय नेतृत्व विकसित होत असते. यात नियोजन, व्यवस्थापन व प्रशासन तसेच स्वयंविकास, अन्य शालेय घटकांचा विकास, भागिदारी, संघ बांधणी यातील भूमिका व जबाबदारी यांचा समावेश होतो. नेता हा अध्ययन अध्यापन प्रक्रिया प्रभावी परिणामकारक होण्यासाठी तसेच प्रत्येक विदयार्थ्यांची अपेक्षित संपादणूक गाठण्यासाठी सहका-यांना देखील प्रेरणा देतो आपल्या कार्यक्षेत्रात स्वत:च्या उदाहरणातून शालेय नेतृत्वाचा आदर्श निर्माण करतो. कोल्हापूर जिल्हयातील ग्रामीण भागातील शाळेत बालगृहातीलबालकांच्या शिक्षणासाठी काम करणा-या सौ. मगदूम यांच्या सारखे अनेक मुख्याध्यापक व शिक्षक कोल्हापूर जिल्हयात कार्यरत आहेत. या सर्वांच्या अभ्यासातून बालगृहातील बालकांच्या शिक्षणासाठी यशस्वी कार्य होत राहो हीच मनस्वी सदिच्छा.

**संदर्भ साहित्य :-**


1) परिपत्रक मार्च २०२१ संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे
2) शालेय नेतृत्व विकास कार्यक्रम पूरक वाचन साहित्य जानेवारी २०१८ संचालक,राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे
3) निष्ठा, मुख्याध्यापक आणि शिक्षक यांच्या समग्र प्रगतीसाठी राष्ट्रीय पुढाकार डिसेंबर २०१९ संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,महाराष्ट्र, पुणे.
4) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मानव संसाधन विकास मंत्रालय शिक्षण मंत्रालय
5) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० – सारांश
6) निपा व मीपा स्तरावरील मोड्यूल्स

YouTube Link

1) https://smata.shiksha/mr/
2) https://balgrah.youtube.com
3) https://maharashtratimes.comarcticle
4) https://womenchild.maharashtra.gov.in
5) https://legistative.gov.in
6) https://www.tiss.edu


**मोड्यूल विकसक**
डॉ.अंजली रसाळ
वरिष्ठ अधिव्याख्याता
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, कोल्हापूर

**समन्वयन**
डॉ.ज्योती कुलकर्णी
समन्वयक
महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा), औरंगाबाद

**मार्गदर्शक**
श्री.रमाकांत काठमोरे
संचालक
महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा),औरंगाबाद